असा. क्र. ८२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जून ५, २००८/ज्येष्ठ १५, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जून २००८

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक अरजा. २४०८/प्र.क्र.१०/सेवा-८.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ यांच्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहेत,—

१. या नियमांस महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) (सुधारणा) नियम, २००८ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ६९ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात यावा :—

**६९-ए. शासकीय कर्मचाऱ्याचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना प्रदेय असलेल्या रजा वेतनाची रोख सममूल्य रक्कम.**

शासकीय कर्मचाऱ्याचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास नियम ६९ अन्वये प्रदेय असलेल्या रजा वेतनाची रोख सममूल्य रक्कम खालीलप्रमाणे प्रदेय राहील,—

(*i*) जर मृत शासकीय कर्मचारी पुरूष असेल तर त्याच्या विधवेला आणि एकाहून अधिक विधवा असतील तर, हयात ज्येष्ठ असलेल्या विधवेला, किंवा मृत शासकीय कर्मचारी स्त्री असेल तर पतीला ;

**स्पष्टीकरण.**—"हयात ज्येष्ठ विधवा" या संज्ञेचा अर्थ, हयात विधवांच्या विवाह दिनांकानुसार असलेल्या वरिष्ठतेच्या संदर्भात लावला जाईल, त्याच्या वयाच्या संदर्भात नव्हे.

(*ii*) यथास्थिती, विधवा किंवा विधुर नसल्यास, हयात ज्येष्ठ मुलाला, किंवा दत्तक मुलाला ;

(*iii*) वरील (*i*) व (*ii*) च्या अभावी, हयात ज्येष्ठ अविवाहित मुलीला ;

(*iv*) वरील (*i*) ते (*iii*) च्या अभावी, हयात ज्येष्ठ विधवा मुलीला ;

(*v*) वरील (*i*) ते (*iv*) च्या अभावी, वडिलांना ;

(*vi*) वरील (*i*) ते (*v*) च्या अभावी, आईला ;

(*vii*) वरील (*i*) ते (*vi*) च्या अभावी, अठरा वर्षे वयाखालील ज्येष्ठ हयात भावाला ;

(*viii*) वरील (*i*) ते (*vii*) च्या अभावी, ज्येष्ठ हयात अविवाहित बहिणीला ;

(*ix*) वरील (*i*) ते (*viii*) च्या अभावी, ज्येष्ठ हयात विधवा बहिणीला ;

(*x*) वरील (*i*) ते (*ix*) च्या अभावी, ज्येष्ठ हयात विवाहित मुलीला आणि

(*xi*) वरील (*i*) ते (*x*) च्या अभावी, पूर्वीच मृत्यू पावलेल्या ज्येष्ठ मुलाच्या ज्येष्ठ मुलाला.

३. सदर शासन अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in.* या वेब- साईटवर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा सांकेतांक २००८०६०४१११२२५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शि. म. म्हात्रे,**

शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th June 2008

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. LVE. 2408/CR-10/SER-8.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Leave) Rules, 1981, namely :—

1. These rules may be called by the Maharashtra Civil Services (Leave) (Amendment) Rules, 2008.

2. After rule 69 of the Maharashtra Civil Services (leave) Rules, 1981, the following rule shall be inserted namely :—

**" 69-A. Payment of cash equivalent of leave salary in case of death while in service to his family.—**

In the event of the death of a Government servent while in service, the cash equivalent of the leave salary payable under rule 69 shall be payable,—

(*i*) to the widow, and if there are more widows than one, to the eldest surviving widow if the deceased was a male Government servent, or to the husband, if the deceased was a female Government servent ;

**Explanation.**—The expression "eldest surviving widow " shall be construed with reference to the seniority according to the date of the marriage of the surviving widows and not with reference to their ages ;

(*ii*) failing a widow or husband, as the case may be, to the eldest surviving son ; or an adopted son ;

(*iii*) failing (*i*) and (*ii*) above, to the eldest surviving unmarried daughter ;

(*iv*) failing (*i*) to (*iii*) above, to the eldest surviving widowed daughter ;

(*v*) failing (*i*) to (*iv*) above, to the father ;

(*vi*) failing (*i*) to (*v*) above, to the mother ;

(*vii*) failing (*i*) to (*vi*) above, to the eldest surviving brother below the age of eighteen years ;

(*viii*) failing (*i*) to (*vii*) above, to the eldest surviving unmarried sister ;

(*ix*) failing (*i*) to (*viii*) above, to the eldest surviving widowed sister ;

(*x*) failing (*i*) to (*ix*) above, to the eldest surviving married daughter ; and

(*xi*) failing (*i*) to (*x*) above, to the eldest Child of the eldest predeceased son."

3. This Government Notification is available on the website of Government of Maharashtra i.e. *www.maharashtra.gov.in.* and its computer code number is 200806041122560001.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. M. MHATRE,
Deputy Secretary to Government.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, गोरेगाव, महाराष्ट्र, मुंबई (५० प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, "बी" ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती प्रत्येकी (१० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (१० प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (१० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग.
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रत्येकी ५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्रशिक्षण उप संचालक, (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखापरीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर (१० प्रती),
कुलसचिव, मराठवाडा कृषिविद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय (२५ प्रती),
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, सेवा-८.

*पत्राद्वारे.